# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२/९/२०१३

**दि. २/९/२०१३ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक २/९/२०१३ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | सौ. मिना कुमार आयलानी | सभापती |
| २ | श्री. सुरेश मधुकर जाधव | सदस्य |
| ३ | डॉ. महेश गजानन गावडे | सदस्य |
| ४ | सौ. पचंशीला नाना पवार | सदस्या |
| ५ | सौ. आशा प्रभुनाथ गुप्ता | सदस्या |
| ६ | श्री. नरेंद्र (कुमारी) केवलराम ठाकुर | सदस्य |
| ७ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | सदस्य |
| ८ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे | सदस्या |
| ९ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे | सदस्य |
| १० | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | सदस्या |
| ११ | श्री. राम फुंदुमल पारवानी | सदस्य |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | सदस्य |
| १३ | श्री. सतरामदास फतनदास जेसवानी | सदस्य |
| १४ | श्री. गणपत गोविंद एडके | सदस्य |
| १५ | श्रीमती कांचन अमर लुंड | सदस्या |

तर,

१. सदस्या, कु. जयश्री जीवनलाल जग्यासी हया अनुपस्थित होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. डी.जी. पवार, उप—आयुक्त, मुख्यालय
२. श्री. योगेश गोडसे, महापालिका सचिव
३. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
४. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत
५. श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. एस.एम. अली, प्र. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
९. श्री. भगवान कुमावत, प्र. भांडार विभाग प्रमुख
१०. श्री. मनिष हिवरे, मुख्य बाजार निरिक्षक
११. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती विशाखा सावंत
३. श्रीमती नर्गीस खान

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–**श्री. गोडसे साहेब, यांची महापालिका सचिव म्हणुन नेमणूक झाल्यानंतर ही पहिलीच सभा आहे. आपण सर्वजण त्यांना पुष्पगुच्छ देवुन ते चांगले काम करतील अशी शुभेच्छा व्यक्त करु या.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**यापुर्वी श्री. प्रकाश कुकरेजा हे महापालिका सचिव होते, त्यांनी अतिशय चांगल्याप्रकारे काम केलेले आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवुन यांनी कामकाज केले तर हेही चांगले काम करु शकतील.

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:–**हिंदीत बोलले तर फार चांगले होईल.

**सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :–**का? मराठी समजत नाही का? मराठी समजते तर आहे ना?

सांयकाळी ४.१८ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक ३/६/२०१३ (त्यात दिनांक ४/६/२०१३ व दिनांक ६/६/२०१३) तसेच दिनांक २१/८/२०१३ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:–**मागील सभेचे दिनांक ३/६/२०१३ (त्यात दिनांक ४/६/२०१३ व दिनांक ६/६/२०१३) तसेच दिनांक २१/८/२०१३ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक ३/६/२०१३ (त्यात दिनांक ४/६/२०१३ व दिनांक ६/६/२०१३) तसेच दिनांक २१/८/२०१३ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्रीमती वसुधा बोडारे
अनुमोदकाचे नांव : श्री. गणपत एडके

**स्थायी समिती ठराव क्र. :–** **६ ड** **दिनांक : २/९/२०१३**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले ३/६/२०१३ (त्यात दिनांक ४/६/२०१३ व दिनांक ६/६/२०१३) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २९ पर्यंतचे तसेच दिनांक २१/८/२०१३ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २ :—** उल्हासनगर शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याकामी न्युनत्तमदराचे निविदाकार मेसर्स जे.पी. कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन तयार करण्यांत आलेली प्रभाग समिती निहाय ज्या रस्त्यांवरील खड्डे भरायचे आहेत अशा रस्त्यांची यादी सन्माननिय सदस्यांना प्रस्तुत करण्यांत आली.

# ULHASNAGAR MUNICIPAL ORPORATION

**Report of Fillng Patholes by Asphalt in Ward Office No.1**

| Sr. No. | Location | Area | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Alpha Medical to Hardasmal Hotel | 61.00 | 29896.10 |
| 2 | Zulela Chowk to Saibaba Chowk | 172.20 | 84395.22 |
| 3 | Avatram Chowk to Amardham Chowk | 130.20 | 63811.02 |
| 4 | UMC School No.18/24 to Khemani Chowk | 428.85 | 210179.39 |
| 5 | Balkanjibari to Basharam Apts., | 17.10 | 8380.71 |
| 6 | Gulshan Nagar | 241.00 | 118114.10 |
| 7 | Dunichand College to Mahatma Phule Chowk | 184.80 | 90570.48 |
| 8 | Dr. Nadhani to UMC School No.24 | 44.00 | 21564.40 |
| 9 | Avatram Chowk to Red Cross Hospital (Trench Patti) | 88.70 | 43471.87 |
| 10 | Ramrao Mhalgi Stage to Vadar Chowk | 275.00 | 134777.50 |
| 11 | Azad Soap Factory to Rana Compound Asharam Ashram Marg | 1125.00 | 551362.50 |
| 12 | MIDC Road | 88.70 | 43471.87 |
| **Grand Total** | | **2856.55** | **1399995.16** |

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

**Report of Fillng Patholes by Asphalt in Ward Office No.2**

| Sr. No. | Location | Area | Amount |
|---|---|---|---|
| 1 | O.T. Section to Radhabai Chowk | 67.34 | 33003.33 |
| 2 | Ambedkar Chowk | 167.99 | 82331.90 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | OT Section to Pinto park via. Gulraj Tower | 287.29 | 140800.83 |
| 4 | Nehru Chowk to Follower lane via. Seva Sadan College | 327.46 | 160488.15 |
| 5 | Radhaswami Satsang to OT Section | 1134.00 | 555773.40 |
| 6 | Kranti Nagar to Sai baba Mandir | 144.10 | 70623.41 |
| 7 | Shivaji Chowk to Santu Bldg.via Maharaja Hall | 43.70 | 21417.37 |
| 8 | Hukamatrai Apts. To Link road | 137.00 | 67143.70 |
| 9 | Aman Society Road | 54.00 | 26465.40 |
| 10 | E.S.I.S.Road | 108.00 | 52930.80 |
| 11 | HDFC Bank (Turning Point) to Sadhu Vaswani Chowk | 211.00 | 103411.10 |
| 12 | Devi Bhavani to Madhuban Chowk | 104.00 | 50970.40 |
| 13 | Regency Hall to Sapna Garden Road | 150.00 | 73515.00 |
| 14 | Asha Society to Jethanand and link to Central Octroi Naka | 164.50 | 80621.45 |
| 15 | Derby Hotel to Hiraghat Mandir | 72.00 | 35287.20 |
| 16 | School No.17 to Prabhudha Nagar | 38.55 | 18893.36 |
| 17 | Ashok Anil Cinema to Khatri Bhawan | 131.20 | 64301.12 |
| 18 | Ruchika Palace to Madhuri Apts. | 64.90 | 31807.49 |
| | Total | **3407.03** | **1669785.40** |

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

**Report of Fillng Patholes by Asphalt in Ward Office No.2**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Bharat Cinema via Hanuman Mandir to RKT College surrounding area Sapana Garden | 1124.00 | 550872.40 |
| 2 | Manish Nagar | 1020.00 | 499902.00 |
| 3 | Khattanmal Chowk to Nevantram House Old post office | 816.15 | 399995.12 |
| **Grand Total** | | **2960.15** | **1450769.52** |

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

**Report of Fillng Patholes by Asphalt in Ward Office No.3**

| Sr. No. | Location | Area | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Shantinagar Naka to Pawai Chowk | 2401.32 | 1176886.93 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | Hadakmai Mata Chowk, Vitthalwadi Chowk to Boat Club | 980.55 | 480567.56 |
| 3 | Kamla Apts (Pawai Chowk) to Rotari Gardan Chowk | 821.40 | 402568.14 |
| 4 | Shreeram Petrol Pump to (Transfarmer) Manera Gaon S.S.T. Collage | 761.90 | 373407.19 |
| 5 | Manera Junction to ROB Bridge | 274.00 | 134287.40 |
| 6 | Jungal Hotel to Shani Mandir | 350.75 | 171902.58 |
| 7 | Mahalaxmi Beer Bar to Nagkanya Mandir | 338.00 | 165653.80 |
| 8 | Shreeram Chowk Area | 508.50 | 249215.85 |
| 9 | K.J. Compound to Bharti Hotel, Bhauji Nagar | 1584.75 | 776685.98 |
| 10 | Patch Work in Panel No.24 | 547.85 | 268501.29 |
| | **Total** | **8569.02** | **4199676.70** |

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

**Report of Fillng Patholes by Asphalt in Ward Office No.3**

| Sr. No. | Location | Area | Amount |
|---|---|---|---|
| 1 | UMC School No.12 | 395.00 | 193589.50 |
| 2 | Mohta mata Mandir to Kalyan-Ambernath Road | 2130.00 | 1043913.00 |
| **Grand Total** | | **2525.00** | **1237502.50** |

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

**Report of Fillng Patholes by Asphalt in Ward Office No.4**

| Sr. No. | Location | Area | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Sawmi Shanti Prakash Statue to Ganesh Nagar | 1235.00 | 605273.50 |
| 2 | Netaji Chowk to Kailash Colony Via Kaali Mata Chowk | 348.00 | 170554.80 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | Gurudwara Lal Chakki to Guru Nanik School via Ashok Van Sasane House Bhim Chowk | 1991.00 | 975789.10 |
| 4 | Budh Colony to Behind Guru Nanak Chowk (Ramesh Ingle Chowk) | 1245.00 | 610174.50 |
| 5 | Kaansai Road to Bharat Nagar to Limbini Van | 660.00 | 323466.00 |
| 6 | Sahyadri Nagar to Blk. A-745 | 31.00 | 15193.10 |
| 7 | Netaji School to Nijdham Ashram Via Anandpuri Satsang | 1510.00 | 740051.00 |
| 8 | Netaji to Tahasil office Via Valmiki Vasahat & Nr. Shastri Hall | 1038.00 | 508723.80 |
| 9 | Oxy Park to New English School Via Sainath Colony | 106.50 | 52195.65 |
| 10 | Kali Mata Chowk to Ambedkar Udyan Via Ramabai Chowk | 142.05 | 69618.71 |
| 11 | Kailash Colony Rajaram Patil to Vijay Patil Chawl old Ambernath Village | 96.00 | 47049.60 |
| 12 | Durga Pada Chowk to colour Factory Via Cholekar Pada | 266.00 | 130366.60 |
| 13 | Gaikwad Pada Chowk Nr. Shankar Parvati Niwas to Naka No.11 Shiv Sena Shakha | 666.05 | 326431.11 |
| 14 | Bk.2058 to Tanker Point | 1040.00 | 509704.00 |
| 15 | Mane Ent Gate to Monish Mahal Apts & Dev Samaj to surrounding Peace Park | 264.50 | 129631.45 |
| 16 | Vinod Apts to Hirapuri Chowk, Gokul Naka | 656.00 | 321505.60 |
| 17 | Ration Office to Vashu Chawl via Padam Soap | 397.00 | 194569.70 |
| | **Total** | **11692.10** | **5730298.21** |

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

**Report of Fillng Patholes by Asphalt in Ward Office No.4**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Ganesh Mandir to Water Supply ESR | 612.50 | 300186.25 |
| 2 | Bhagat Nagar Gate to Chaliya Saheb to Link Road | 365.00 | 178886.50 |
| 3 | Mukh badhir School to Chaliya Saheb Via Gau Shalla | 910.00 | 445991.00 |
| 4 | Tahasildar Office to Math Mandir via Fish Market Link to Padm Soap | 1380.00 | 676338.00 |
| 5 | Ram Raksha Hospital to Hirapuri Chowk | 1047.00 | 513134.70 |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | Hirapuri Chowk to Sahyadri Nagar | 390.00 | 191139.00 |
| **Grand Total** | | **4704.50** | **2305675.45** |

4993947.47

**सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—**ही जी यादी दिलेली आहे, ती इंग्रजीतुन दिलेली आहे. मराठीतुन यादी देत जा असे प्रत्येक वेळा सांगुन सुध्दा तुम्ही इंगजीतुनच यादी देत आहात.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—**सांगा काय विषय आहे? कोण सांगेल?

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**ही जी यादी दिलेली आहे ती प्रभाग समिती क्र. १,२,३ व ४ मधील रस्त्यांची दिलेली आहे. गोषवा—यामध्ये ही जी रक्कम दर्शविली आहे, एवढया रक्कमेतुन शहरातील सर्व रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम पुर्ण होईल ना?

**प्र. शहर अभियंता, श्री. आर.बी. शिर्के:—** 'अ' अंदाजपत्रक भाग —१ क्र. ५ (४) रस्ते दुरुस्ती या लेखा शिर्षात मागील दायित्व वजा जाता चालु वर्ष सन २०१३—१४ साठी एकुण तरतुद रुपये १.८६ लाख एवढी आहे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**माझी अशी सूचना आहे की, वाढीव काम झाले तर अंतर्भुत खर्चात ५० टक्के वाढ करुन होणा—या खर्चास व सदरचा खर्च हा अति तातडीचा असल्याने अदा करण्यास या सभेतच मान्यता दिली जावी.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:—**शहरातील मोठ मोठया रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम अगोदर होते. त्यानंतर लहान—मोठया रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम राहुन जाते त्यावेळी सांगितले जाते की पैसे शिल्लक नाहीत त्यामुळे कामे होत नाहीत. यासाठी माझे असे सांगणे आहे की, शहरातील सर्व रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम झाले पाहिजे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम अति आवश्य असल्याने याप्रमाणे प्रस्ताव पारीत झाला पाहिजे.

**सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:—**९ तारखेच्या अगोदरच रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम पुर्ण झाले पाहिजे. ७ तारखेपासुनच गणपतींच्या आगमनाची सुरुवात होणार असल्याने रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामास उशिर करु नका.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**स्थायी समितीचे जे ठराव पारीत होतात त्याची अंमलबजावणी होत नाही. स्थायी समितीच्या मागील सभेत जे निर्देश दिले होते त्यानुसारच्या प्रकालनांवर अदयाप स्वाक्षरी झालेली नाही. यावर्षी स्थायी समितीच्या सदस्यांचा पाच—पाच लाखाचा जो निधी ठेवलेला आहे, त्यांची प्राकलने अदयाप तयार केलेली नाहीत.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**स्थायी समितीच्या १६ च्या १६ सदस्यांच्या प्रभागातील कामांची प्राकलने स्थायी समितीच्या पुढील सभेत मंजुरीस ठेवली जावीत.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—**निधी तर आहे ना?

**उप—आयुक्त मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री. डी.जी. पवार :—**५—५ लाखाच्या निधीचे काय आहे?

**प्र. शहर अभियंता, श्री. आर.बी. शिर्के:—** अर्थसंकल्पीय तरतुद बघुन मी सर्व प्रस्ताव तयार करुन देतो.

यावेळी सदस्य श्री. अंकुश म्हस्के यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :—**मागील वर्षाचेही काम बाकी आहे. ते व या वर्षाच्या निधीतील कामांचे प्रस्ताव एकत्रितरित्या मंजुरीस आणले जावे.

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी :—**या अगोदरच्या निधीतील व आताच्या निधीतील कामांचे प्रस्ताव एकत्रीतरित्या मंजुरीस आणले जावेत.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**सभापती महोदयांनी आता जे काही सांगितले त्याप्रमाणे ती कामे वेळेवर होतील का? आज काल शहर अभियंता कोठे आहेत, ते कोणाला माहित नाही. मी कोणाच्या विरोधात नाही. शहराची कामे झाली पाहिजेत.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—**शहर अभियंतांना बोलु दया. ते याबाबतीत काय बोलत आहेत, ते काय खात्री देत आहेत.

**प्र. शहर अभियंता, श्री. आर.बी. शिर्केः—**सर्व प्रस्ताव एकत्रित सादर केले जातील. आता या कामाचा प्रस्ताव पारीत केला तर कार्यादेश देवुन उदयापासुनच रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम सुरु करता येईल.

**सदस्या श्रीमती कांचन लुंडः—**शाळा नं. १२ ते २६ सेक्शन या रस्त्याचे काम हाती घेतले जावे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**त्या ज्या कोणत्या रस्त्याचे ठिकाण सुचवत आहेत त्याचाही यामध्ये समावेश करुन काम चालु केले जावे.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**पाईपलाईन टाकण्यासाठी पाणी पुरवठा विभागाने जे रस्ते खोदले होते, ते त्यांनी पुर्वव्रत करुन देणे आवश्यक होते. ते त्यांनी का केले नाही याचा आयुक्तांनी खुलासा केला पाहिजे.

**सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—**कमीत कमी तीन—चार वेळा रस्ते खोदले आहे ते पुर्वव्रत केले नाहीत त्यामुळे कल्व्हर्टसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**सदस्या श्रीमती कांचन लुंड :—**रिलायन्स वाल्यांनी खुप त्रास दिलेला आहे, त्यांनी खोदलेले रस्ते अदयाप पुर्वव्रत केलेले नाही.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**ईगल वाल्यांचे काम अदयापपर्यंत चालु आहे का? मागील वेळेस त्यांनी जे रस्ते खोदले आहेत ते अदयाप पुर्वव्रत केलेले नाहीत.

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—**आता ते रस्ते परत खोदणार का?

**प्र. शहर अभियंता, श्री. आर.बी.. शिर्केः—**आता जलवाहिन्या टाकुन झालेल्या आहेत त्यामुळे रस्ते खोदण्याची आवश्यकता पडणार नाही.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**भारत सिनेमा ते आर.के.टी.कॉलेजचा रस्त्यावर खुपच खड्डे आहेत या रस्त्याचे काम सुध्दा या यादीमध्ये समाविष्ट केले जावे.

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—**लालचक्की येथील रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम सुध्दा केले जावे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**तो रस्ताही समाविष्ट केला जाईल.

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

**Report of Fillng Patholes by Asphalt in Ward Office No.2, 3, 4**

| Sr. No. | Location | Area | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Bharat Cinema via Hanuman Mandir to RKT College surrounding area Sapana Garden | 1124.00 | 550872.40 |
| 2 | Manish Nagar | 1020.00 | 499902.00 |
| 3 | Khattanmal Chowk to Nevantram House Old post office | 816.15 | 399995.12 |
| 4 | UMC School No.12 | 395.00 | 193589.50 |
| 5 | Mohta mata Mandir to Kalyan-Ambernath Road | 2130.00 | 1043913.00 |
| 6 | Ganesh Mandir to Water Supply ESR | 612.50 | 300186.25 |
| 7 | Bhagat Nagar Gate to Chaliya Saheb to Link Road | 365.00 | 178886.50 |
| 8 | Mukh badhir School to Chaliya Saheb Via Gau Shalla | 910.00 | 445991.00 |
| 9 | Tahasildar Office to Math Mandir via Fish Market Link to Padm Soap | 1380.00 | 676338.00 |
| 10 | Ram Raksha Hospital to Hirapuri Chowk | 1047.00 | 513134.70 |
| 11 | Hirapuri Chowk to Sahyadri Nagar | 390.00 | 191139.00 |
| **Grand Total** | | **10189.65** | **4993947.47** |

<u>काही सदस्य:—</u>पास,पास.......

<u>सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे



---

☑ **विषय क्र. २ :—** उल्हासनगर शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याकामी न्युनत्तमदराचे निविदाकार मेसर्स जे.पी. कंपनी यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर मधील प्रमुख रस्त्यांमध्ये पावसाळया दरम्यान व पावसाळयानंतर रस्त्यांमधील खड्डे भरण्याचे काम करण्यासाठी एकुण रु.१,३०,००,०००/— खर्चाचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. या कामाची निविदा काढण्यात आली होती. त्यामध्ये ३ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदाकारांच्या निविदेमधील बाबी खालीलप्रमाणे

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. जयहिंद रोड बिल्डर्स | मे. जयभारत कन्स्ट्रक्शन | मे. जे.पी. कंपनी |
|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्राची ॲक्सिस बँक खाते क्र. ९१००२००३९७४२६९६ मध्ये रु.१०,०००/— रकमेची पावती. | आहे | आहे | आहे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | अनामत रक्कम रु.१,३०,०००/– ॲक्सिस बँक खाते क्र.९१००२००४५२४६०७० मध्ये जमा केल्याची पावतीची स्कॅन प्रत | आहे | आहे | आहे |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात वर्ग–४–अ मध्ये नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे |
| ४ | लेटेस्ट आयकर रिटर्न भरण्याची पावती | आहे | आहे | आहे |
| ५ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा–यांची माहिती | आहे | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराने जारी केलेले मुखत्यारपत्र | आहे | आहे | आहे |
| ७ | जॉईंट व्हेंचर नसावे. | लागू नाही | लागू नाही | आहे |
| ८ | परिशिष्ट–२ | आहे | आहे | आहे |
| ९ | परिशिष्ट –३ | आहे | आहे | आहे |
| १० | परिशिष्ट–४ | आहे | आहे | आहे |
| ११ | परिशिष्ट–५ | आहे | आहे | आहे |
| १२ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) | आहे | आहे | आहे |
| १३ | व्हॅट रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट | आहे | आहे | आहे |
| १४ | विक्रीकर/व्हॅट रिर्टन भरण्याची पावती | आहे | आहे | आहे |
| १५ | पॅन कार्डाची प्रत | आहे | आहे | आहे |
| १६ | केंद्र/राज्य/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये निविदाकाराने निविदेत नमुद केलेल्या कामाच्या किंमतीच्या ८० टक्के पेक्षा कमी नसलेल्या सम प्रकारच्या एका कामाचा मागील ७ वर्षांनी अनुभवाचे प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे |
| १७ | मागील तीन वर्षामध्ये वार्षिक उलाढाल ४० लक्ष असणे. | आहे | आहे | आहे |
| १८ | मागील तीन वर्षातील २००९–१०, २०१०–१०, २०११–१२ मधील लेखा परिक्षण तक्ते. | आहे | आहे | आहे |
| १९ | प्लांट मशिनरी,व्हायब्रेटर रोलर,स्टॅटीक रोल्ट, पेव्हर फिनिशर यांची मालकी असल्याचे दस्तऐवज | आहे | आहे | आहे |
| २० | मेमोरॅडम | आहे | आहे | आहे |

निविदा समिती मार्फत तपासणी केले असता उपरोक्त तीनही निविदाधारकांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केलेली आढळली. त्यामुळे सर्व तीनही निविदाधारकांचा दुसरा लिफाफा दिनांक २८/०८/२०१३ रोजी उघडण्यात आला. सदर निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र. | निविदाकारांचे नांव | दर |
|---|---|---|
| १. | मे. जयभारत कन्स्ट्रक्शन कं, उल्हासनगर | २७.२७ टक्के जास्त |
| २. | मे. जयहिंद रोड बिल्डर्स, उल्हासनगर | १४.४० टक्के जास्त |
| ३. | मे. जे.पी. कंपनी | ९.५० टक्के जास्त |

सदर निविदेचे प्राकलन सन २०११–१२ च्या दरसूचीवर आधारीत आहे. उक्त निविदाधारकांपैकी सर्वात निम्न दराचे निविदाकार मे.जे.पी.कंपनी यांचेशी वाटाघाटी केल्या असता त्यांनी ४.५५ टक्के दर कमी करण्यास तयारी दर्शविली आहे.

निविदाकार यांनी निविदेत भरलेले ९.५०% जास्त दर निविदा दर ४.५५% कमी केल्यानंतर निविदा ४.९५% जास्त दराची होत आहे. सदरच्या निविदेतील प्राकलनिय दर वर्ष २०११–१२ च्या दरसुचीवर आधारीत आहे. या दराप्रमाणे प्रस्तावित कामाची किंमत रु.१,२९,९८,७५०/– इतकी आहे. वर्ष २०१२–१३ च्या दरसुचीप्रमाणे या कामाची किंमत रु.१,३६,४२,६३१/– होत आहे. ही किंमत मूळ प्राकलनिय किंमतीपेक्षा ४.९६% ने

जास्त आहे. त्यामुळे निविदाकाराने त्याच्या दरात कपात करुन दिल्यानंतर येणारा दर चालू प्राकलनिय दरापेक्षा कमी होत असल्याने सदर निविदा मंजूर होण्यास शिफारस करण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त निविदा कार्यवाहीस लागणारा कालावधी विचारात घेवून चालू पावसाळयात रस्त्यात पडलेले खड्डे ताबडतोब भरता यावे याकरीता खडीकरणाने खड्डे भरण्याच्या कामाचे प्रभागक्षेत्र निहाय ४ प्राकलने एकूण रु.२०,५४,७०६/— इतकी तयार करुन त्यावरील खर्च उपरोक्त रु.१.३० कोटी निविदेसाठी वापरलेल्या तरतूदीमधूनच मंजूर करुन घेण्यात आली होती. त्यामुळे रु.१.३६ कोटी खर्चाच्या या निविदेसाठी तरतूद कमी पडणार आहे. तरी उपरोक्त रु.२०,५४,७०६/— व या निविदेतील (रु.१,३६,४२,६३१—रु. १,३०,००,०००/—) = रु.६,४२,६३१/— असे एकूण रु.२६,९७,३३७/— इतकी तरतूद लेखाशिर्ष अ अंदाजपत्रक भाग—१ क—५ (४) रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षात जमा करावी लागणार आहे. सदर तरतूद सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अ अंदाजपत्रक भाग—१ क—३ (१) उद्यान दुरुस्तीमध्ये सध्या उपलब्ध असलेल्या तरतूदीतून तितकी रक्कम वजावट करुन उपरोक्त रस्ते दुरुस्ती लेखाशिर्षात समाविष्ट करण्याचे समायोजनास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ अंतर्गत स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस व अशाप्रकारे उपरोक्त मे.जे.पी.कंपनी यांचे ४.९५% जास्त दराचे निविदेस मान्यता व मा. आयुक्त सो.यांना मे.जे.पी.कंपनी यांचेशी संविदा करण्यास प्राधिकृत करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ क अंतर्गत मा.स्थायी समितीकडून मान्यता मिळणेस प्रस्तावित आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अ अंदाजपत्रक भाग—१ क्र.५ (४) रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षात मागील दायित्व वजा जाता चालू वर्ष २०१३—१४ साठी ठेवलेली एकूण तरतूद | रु.१,८६,६३,४४०/— |
| २ | मागील दायित्व व चालू वर्षातील कामावरील खर्च वजा जाता उपलब्ध होणारी तरतूद | रु.१,३०,००,०००/— |
| ३ | तातडीच्या खड्डे भरणेच्या कामासाठी ४ प्रभागक्षेत्रांसाठी मंजूर केलेल्या कामावरील खर्च | रु.(—) २०,५४,७०६/— |
| ४ | रस्ते दुरुस्ती लेखाशिर्षात शिल्लक राहणारी तरतूद | रु. १,०९,४५,२९४/— |
| ५ | चालू दरसुचीप्रमाणे खड्डे भरण्याच्या निविदेची किंमत | रु.१,३६,४२,६३१/— |
| ६ | रस्ते दुरुस्ती लेखाशिर्षात समायोजित करावयाची रक्कम (५—४) | रु.२६,९७,३३७/— |
| ७ | लेखाशिर्ष अ अंदाजपत्रक भाग—१ क—३ (१) उद्यान दुरुस्ती या लेखाशिर्षात चालू वर्ष २०१३—१४ मध्ये मागील दायित्व व चालू वर्षात आतापर्यंत हाती घेतलेल्या कामांवरील खर्च वजा जाता शिल्लक रक्कमेतून समायोजन करावयाची रक्कम | रु.२६,९७,३३७/— |
| ८ | उपरोक्त रस्ते दुरुस्तीसाठी उपलब्ध होणारी तरतूद (४+७) | रु.१,३६,४२,६३१/— |

**स्थायी समिती ठराव क्र.** ७ **दिनांक:— २/९/२०१३**

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याकामी न्युनत्तमदराचे निविदाकार मेसर्स जे.पी. कंपनी यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चात ५० टक्के वाढ करुन होणा—या खर्चास व सदरचा खर्च हा अति तातडीचा म्हणुन अदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :**—उल्हासनगर शहरातील स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ जंतुनाशक/किटकनाशक औषधे पुरविणे कामी बाबनिहाय न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :**—या विषयाचे स्पष्टीकरण कोण करेल? सभा सूचनेवर हा जो विषय आहे, यात उल्लेख केलेल्या मालापैकी काही माल अगोदरच मागविला आहे का?

**सदस्य श्री. एकनाथ पवार :**—होय मागविला आहे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :**—ही जी ब्लिचींग पावडर मागविले आहे तो सर्व नगरसेवकांना पुरविले पाहिजे. ती आता आली आहे काय?

**उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री. डी.जी. पवार :**—आली आहे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :**—प्रेताच्या दहनासाठी मोफत लाकडे पुरविण्याबाबतीत जो ठराव पारीत झाला आहे त्याची अदयाप अंमलबजावणी झालेली नाही.

**सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:**—ही जी किटकनाशक, अळीनाशक तुम्ही मागवितात ती कोठे वापरता?

**प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक, श्री. एकनाथ पवार :**—जेथे पाणी साठलेले असते तेथे.

**सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :**—आजपर्यंत कोठे कोठे वापरली आहेत? कोण कोणत्या ठिकाणी वापरली आहेत? उदाहरणार्थ सांगा. उल्हासनगरमध्ये अशी कुठली जागा आहे जेथे पाणी साचले आहे आणि कोठे कोठे तुम्ही औषधांची फवारणी केली आहे?

**प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक, श्री. एकनाथ पवार :**—जेथे जेथे पाणी साचते तेथे तेथे आम्ही अळीनाशक व किटकनाशकांची फवारणी करतो.

**सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :**—माझ्या प्रभागातील संतोष नगरमधील आयपीसी सेंटरच्या कंपाउंडमध्ये जुने आयटीआय आहे तेथे या औषधांची फवारणी झाली पाहिजे.

**सदस्य श्री. जयेंद्र मोरे :**—पटेलनगरचा जो एरिया आहे तेथेही ही फवारणी झाली पाहिजे. एरियाचे नाव लिहून घ्या.

**काही सदस्य :**—पास—पास......

**सभापती, श्रीमती मिना कुमार आयलानी:**—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :**— उल्हासनगर शहरातील स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ जंतुनाशक/किटकनाशक औषधे पुरविणे कामी बाबनिहाय न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

सार्वजनिक आरोग्य विभागास उल्हासनगर शहराच्या स्वच्छता, साफसफाईचे कामासाठी व नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने किटकनाशक/जंतुनाशक/ औषधे दरवर्षी खरेदी करणे आवश्यक असते. त्यानुसार मा. आयुक्त सो यांच्या दि. १७/५/२०१३ रोजीच्या मान्यतेनेसदर औषधे/रसायने खरेदीची निविदा ई—टेंडरींगद्वारे प्रसिध्द करुन जाहिर निविदा सुचना १) दै. नवभारत २) दै. मुंबई तरुण भारत व ३) दै. अमृत कलश या दैनिक वृत्तपत्रात दि. २५/५/२०१३ रोजी प्रसिध्द करून दिनांक १२/६/२०१३ रोजी पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्राप्त चार निविदा दिनांक १८/६/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता उप—आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधि यांचे समोर उघडण्यात आल्या. प्राप्त चार

निविदाकारांनी लिफाफा क्र. १ मध्ये आवश्यक कागदपात्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचा निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिली. मात्र निविदेतील अटी व शर्तीनुसार अ. क्र. ११ वरील हायजीन जंतूनाशकासाठी निविदाकराने उत्पादक कंपनीचे ऑथोरायझेशन पत्र जोडले नसल्याने निविदा समितीने सदरचे जंतूनाशक वगळण्याच्या सुचना दिल्या. तद्नंतर वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर जंतुनाशक/किटकनाशक/अळीनाशक /डासनाशक औषधे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र. ३,४,७,१६,१७,१८,१९,२५ व २६ या करीता मे. डॉल्फीन

| अ. क्र. | औषधांचे नांव व त्यांचा तपशील | परिमाण | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. डॉल्फीन | मे. मित्र हर्बल | मे. रविराज | मे. रॉयल |
| १ | ब्लीचीग पावडर, ३३% क्लोरीन आय.एस.आ. प्रमाणीत | १८०००कि. लो. | ३४ | ३५ | २९.७५ | ३३ |
| २ | काळे फिनाईल, शौचालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ७००० लि. | ९३ | ९७ | ७५ | ८८ |
| ३ | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुंगधीत, शौचालयासाठी व कार्यालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० लि. | ७४ | ७७ | ८८ | ८४ |
| ४ | जर्मीटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंर पावडर | ६००० कि. लो. | ६९ | ७१ | ८२ | ७५ |
| ५ | प्रोडेन्टीसाईड झिंक फॉस्फाईडॅ/(रॅटॉल पेस्ट)५० ग्रॅम, उंदीरनाशक | २००० नग (३५/टयुब ग्रा.) | ३९ | ४३ | ४२ | ३७.५ |
| ६ | फिनॉईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता-यांसाठी | ५०० कि.लो. | ३०० | २९५ | २७५ | ३२७ |
| ७ | सफाया मोनोक्लोरो फिनोल पावडर जंतुनाशक दुंगधीनाशक(३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ६००० कि. लो. | ६० | ६१ | ६५ | ६७ |
| ८ | गोल्डमिल बायोक्लचर, डंम्पीग ग्राउंडसाठी/कच-याचे विघटनकरण्यासाठी | २००० लि. | ३८० | ४१३ | ३९६ | ३४५ |
| ९ | ट्राय अॅक्ट, बायोकेमीकल जंतूनाशक पावडर, लिच कंट्रोल तसेच सेप्टीक टॅकसाठी | ६००० कि.लो | १४५ | १५२ | १५९ | १२० |
| १० | मयक्रो फाईन पावडर, सुंगधीत वातावरण निर्मिती करण्यासाठी | ५००० कि.लो | १५२ | १५३ | १३४ | १४८ |
| ११ | हायजीन, किटकनाशक/जंतुनाशक | १००० लि. | ५९८ | ७४९ | ८०० | ८४५ |
| १२ | क्लीनोव्हाईट, दुर्गधीनाशक WHO स्पेसिफीकेशन प्रमाणे | ४००० लि. | १८० | १६४ | १५७ | १७५ |
| १३ | फाईट आउट अळीनाशक | ८०० लि. | १३६३ | १४१७ | १०७५ | ११९९ |
| १४ | प्रिमीफॉस मिथेले ५०% EC अळीनाशक WHO प्रमाणीत एनविबिडीसी प्रोग्रास | ५०० लि. | ० | ० | ० | ० |
| १५ | सॅफीनोथ्रील ५% : EC डासनाशक WHO प्रमाणीत, एनविबिडीसी प्रोग्राम | ५०० लि. | १७६० | १८१० | १८१५ | १५५१ |
| १६ | निमटेक्स, हार्बल अळीनाशक, हाफकीन इस्टिट्युटद्वारा टेस्टेड | ६०० लि. | ११९० | १२४१ | १३१५ | १३९१ |
| १७ | सेप्टी टॅंक पावडर (सेप्टीक्लीन पावडर) शौचालयाचे सेप्टीक टॅंक सफाईसाठी | १००० कि.लो | ५९० | ६५५ | ६६४ | ७९२ |
| १८ | फ्रेश ऑल डिलक्स, (७५ ग्राम) कार्यालयासाठी | ३०० नग | ८५ | ९४ | १०१ | ११८ |
| १९ | पिप बेट, ग्रन्युअलस माशानाशक | ५०० कि.लो | ८२० | १११८ | १२०० | ११६७ |
| २० | वेस्ट ट्रीट पावडर, सिलीकेटर, झेडबेस पावडर एन्ट्रीसेप्टीक पावडर मिनरल पावडर (दुंगधीनाशक व रोगजंतूचा अटकाव करण्यासाठी) | ६००० कि.लो | ९३ | ७९ | १०७ | १०३ |
| २१ | बायोक्लचर पावडर डंपिगं ग्राउडसाठी /कच-याचे विघटन करण्यासाठी आवश्यक घटक – नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कलचर अॅझोटो बॅक्टर – लिगनीग डिग्रेबल बॅक्टोरिया) | ७००० कि.लो | १०० | ८८ | ११० | १०६ |
| २२ | बॅक्ट्रो फ्रि पावडर – किटकनाशक | ८००० कि.लो | ११५ | ९९ | १२१ | १२८ |
| २३ | हॅड्रोक्लोरिक अॅसिड – शौचालय मुता-या सफाई करणेसाठी | ३००० लि. | ४२ | ४६ | ३२ | ४४ |
| २४ | बेक्टोबॅक AC – 1200 अळीनाशक | ७८० लि. | १७०५ | १७७७ | १७३३ | १६५० |
| २५ | बॅक्टोक्लीन व्हाईट क्लिनर, शौचालय सफाईसाठी | ७००० लि. | ७५ | १०४ | ९९ | ९५ |
| २६ | साईथ्रिऑन ५०% EC डासनाशक, किटकनाशक | ८०० लि. | ९९५ | १०५६ | ११०८ | ११७७ |

सेल्स, कल्याण यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. अ.क्र. २०,२१ व २२ या करीता मे. मित्र हर्बल प्रा.लि. कंपनी डोंबिवली यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत, अ.क्र. तर अ.क्र.१,२,६,१०,१२,१३ व २३ या करीता मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली व अ.क्र. ५,८,९,१५ व २४ याकरीता मे. रॉयल इंटरप्राईझेस, मुंबई यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. तर अक्र. १४ प्रिमीफॉस मिथेलसाठी कोणत्याही निविदाकाराने दर सादर कलेले नाहीत व अ.क्र. ११ हायजीन, जंतूनाशक खरेदी करण्याचे वगळण्यात येत आहे.

उक्त सादर केलेल्या न्युनतम दरांची वाटाघाटी करण्यासाठी निविदा समितीने दिलेल्या सुचनानुसार निविदाकारांकडुन न्युनतम दर सादर केलेल्या जंतुनाशक औषधे दरांबाबत जा. क्र.उमपा/उप—आ/आवि/७६ दिनांक २१/०६/२०१३ रोजी अन्वये निविदाकारांना वाटाघाटीसाठी पत्र देऊन त्यांच्याशी उपायुक्त (आरोग्य) यांच्या दालनात दिनांक २४/६/२०१३ रोजी प्राप्त झालेले न्युनतम दरांनुसार वाटाघाटी करण्यात आल्या आहेत. व त्यानुसार संबंधीत न्युनतम दराच्या निविदाकारांनी लेखी पत्र दिलेली आहेत. वाटाघाटी दरम्यान संबधीत निविदाकारांनी इतर नगरपालिकेत/महापालीकेत पुरवठा केलेल्या दरांची प्रती व उत्पादक कंपन्याची दरांच्या छायांकीत प्रती सादर केलेल्या आहेत. त्यानुसार प्राप्त दर वाजवी आहेत. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तक्ता खालीप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | औषधांचे नांव व त्यांचा तपशील | परिमाण | मागील वर्षाचे प्राप्त दर | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर | | | | वाटाघाटी अंती प्राप्त दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मे. डॉल्फीन | मे. मित्र हर्बल | मे. रविराज | मे. रॉयल | |
| १ | ब्लीचीग पावडर, ३३% क्लोरीन आय.एस.आ. प्रमाणीत | १८००० कि.लो. | २७ | ३४ | ३५ | <u>२९.७५</u> | ३३ | **२९** |
| २ | काळे फिनाईल, शौचालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ७००० लि. | ५१ | ९३ | ९७ | <u>७५</u> | ८८ | **६५** |
| ३ | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुंगधीत, शौचालयासाठी व कार्यालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० लि. | ५४ | <u>७४</u> | ७७ | ८८ | ८४ | **६५** |
| ४ | जर्मीटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंर पावडर | ६००० कि.लो. | ६० | <u>६९</u> | ७१ | ८२ | ७५ | **६३** |
| ५ | प्रोडेन्टीसाईड झिंक फॉस्फाईडॅ/(रॅटॉल पेस्ट)५० ग्रॅम, उंदीरनाशक | २००० नग (३५/टयुब ग्रा.) | ३५ | ३९ | ४३ | ४२ | <u>३७.५</u> | **३६** |
| ६ | फिनॉईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता—यांसाठी | ५०० कि. लो. | १६० | ३०० | २९५ | <u>२७५</u> | ३२७ | **२६०** |
| ७ | सफाया मोनोक्लोरो फिनोल पावडर जंतुनाशक दुंगधीनाशक(३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ६००० कि.लो. | ४८ | <u>६०</u> | ६१ | ६५ | ६७ | **५१** |
| ८ | गोल्डमिल बायोक्लचर, डंम्पीग ग्राउंडसाठी/कच—याचे विघटनकरण्यासाठी | २००० लि. | ३७५ | ३८० | ४१३ | ३९६ | <u>३४५</u> | **३४५** |
| ९ | ट्राय अॅक्ट, बायोकेमीकल जंतूनाशक पावडर, लिच कंट्रोल तसेच सेप्टीक टॅकसाठी | ६००० कि.लो | १०७ | १४५ | १५२ | १५९ | <u>१२०</u> | **११२** |
| १० | मयक्रो फाईन पावडर, सुंगधीत वातावरण निर्मिती करण्यासाठी | ५००० कि.लो | ११६ | १५२ | १५३ | <u>१३४</u> | १४८ | **१२०** |
| ११ | हायजीन, किटकनाशक/जंतुनाशक | १००० लि. | | | | | | |
| १२ | क्लीनोव्हाईट, दुर्गधीनाशक WHO स्पेसिफीकेशन प्रमाणे | ४००० लि. | १२० | १८० | १६४ | <u>१५७</u> | १७५ | **१४५** |
| १३ | फाईट आउट अळीनाशक | ८०० लि. | ९०५ | १३६३ | १४१७ | <u>१०७५</u> | ११९९ | **९४५** |
| १४ | प्रिमीफॉस मिथेले ५०% EC अळीनाशक WHO प्रमाणीत एनविबिडीसी प्रोग्रास | ५०० लि. | | ० | ० | ० | ० | ——— |
| १५ | सॅफीनोथ्रील ५% : EC डासनाशक WHO प्रमाणीत, एनविबिडीसी प्रोग्राम | ५०० लि. | | १७६० | १८१० | १८१५ | <u>१५५१</u> | **१४७०** |
| १६ | निमटेक्स, हार्बल अळीनाशक, हाफकीन इस्टिट्युटद्वारा टेस्टेड | ६०० लि. | ६६५ | <u>११९०</u> | १२४१ | १३१५ | १३९१ | **९४९** |
| १७ | सेप्टी टॅक पावडर (सेप्टीक्लीन पावडर) शौचालयाचे सेप्टीक टॅक सफाईसाठी | १००० कि.लो | ५४० | <u>५९०</u> | ६५५ | ६६४ | ७९२ | **५६५** |
| १८ | फ्रेश ऑल डिलक्स, (७५ ग्राम) कार्यालयासाठी | ३०० नग | ७७ | <u>८५</u> | ९४ | १०१ | ११८ | **७८** |
| १९ | पिप बेट, ग्रन्युअलस माशानाशक | ५०० कि. लो | ६९० | <u>८२०</u> | १११८ | १२०० | ११६७ | **७८९** |
| २० | वेस्ट ट्रीट पावडर, सिलीकेटर, झेडबेस पावडर एन्ट्रीसेप्टीक पावडर मिनरल पावडर (दुंगधीनाशक व रोगजंतूचा अटकाव | ६००० कि.लो | ७३ | ९३ | <u>७९</u> | १०७ | १०३ | **७५** |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | करण्यासाठी) | | | | | | | |
| २१ | बायोक्लचर पावडर डंपिगं ग्राउडसाठी /कच–याचे विघटन करण्यासाठी आवश्यक घटक – नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कलचर अॅझोटो बॅक्टर – लिगनीग डिग्रेबल बॅक्टोरिया) | ७००० कि.लो | ८२ | १०० | ८८ | ११० | १०६ | ८४ |
| २२ | बॅक्ट्रो फ्रि पावडर – किटकनाशक | ८००० कि.लो | ९२ | ११५ | ९९ | १२१ | १२८ | ९० |
| २३ | हॅड्रोक्लोरिक ॲसिड – शौचालय मुता–या सफाई करणेसाठी | ३००० लि. | २७ | ४२ | ४६ | ३२ | ४४ | ३० |
| २४ | बेक्टोबॅक AC – 1200 अळीनाशक | ७८० लि. | १४४२ | १७०५ | १७७७ | १७३३ | १६५० | १५६० |
| २५ | बॅक्टोक्लीन व्हाईट क्लिनर, शौचालय सफाईसाठी | ७००० लि. | ६३ | ७५ | १०४ | ९९ | ९५ | ६९ |
| २६ | साईथ्रिऑन ५०% EC डासनाशक, किटकनाशक | ८०० लि. | ८७५ | ९९५ | १०५६ | ११०८ | ११७७ | ९१५ |

उक्त वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार व उपलब्ध आर्थिक तरतुदीनुसार खालील प्रमाणे आवश्यक जंतूनाशक/किटकनाशकांचा पुरवठा करुन घेण्यात येत आहे.

| अ. क्र. | औषधांचे नांव व त्यांचा तपशील | आवश्यक परिमाण | वाटाघाटी अंती प्राप्त दर | अपेक्षीत खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | ब्लीचीग पावडर, ३३% क्लोरीन आय.एस.आ. प्रमाणीत | १५००० कि.लो. | २९ | ४३५००० |
| २ | काळे फिनाईल, शौचालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ६००० लि. | ६५ | ३९०००० |
| ३ | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुंगधीत, शौचालयासाठी व कार्यालयासाठी (३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० लि. | ६५ | ३२५००० |
| ४ | जर्मीटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंर पावडर | ५००० कि.लो. | ६३ | ३१५००० |
| ५ | प्रोडेन्टीसाईड झिंक फॉस्फाईडॅ/(रॅटॉल पेस्ट)५० ग्रॅम, उंदीरनाशक | २००० नग (३५/टयुब ग्रा.) | ३६ | ७२००० |
| ६ | फिनॉईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता–यांसाठी | ५०० कि.लो. | २६० | १३०००० |
| ७ | सफाया मोनोक्लोरो फिनोल पावडर जंतुनाशक दुंगधीनाशक(३५ लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | ५००० कि.लो. | ५१ | २५५००० |
| ८ | गोल्डमिल बायोक्लचर, डंम्पीग ग्राउंडसाठी/कच–याचे विघटनकरण्यासाठी | १००० लि. | ३४५ | ३४५००० |
| १० | मयक्रो फाईन पावडर, सुंगधीत वातावरण निर्मिती करण्यासाठी | १५०० कि.लो | १२० | १८०००० |
| १३ | फाईट आउट अळीनाशक | ५०० लि. | ९४५ | ४७२५०० |
| १५ | सॅफीनोथ्रील ५% : EC डासनाशक WHO प्रमाणीत, एनविबिडीसी प्रोग्राम | २५० लि. | १४७० | ३६७५०० |
| १७ | सेप्टी टॅक पावडर (सेप्टीक्लीन पावडर) शौचालयाचे सेप्टीक टॅक सफाईसाठी | ५०० कि.लो | ५६५ | २८२५०० |
| १८ | फ्रेश ऑल डिलक्स, (७५ ग्राम) कार्यालयासाठी | ३०० नग | ७८ | २३४०० |
| २० | वेस्ट ट्रीट पावडर, सिलीकेटर, झेडबेस पावडर एन्ट्रीसेप्टीक पावडर मिनरल पावडर (दुंगधीनाशक व रोगजंतूचा अटकाव करण्यासाठी) | ५००० कि.लो | ७५ | ३७५००० |
| २१ | बायोक्लचर पावडर डंपिगं ग्राउंडसाठी /कच–याचे विघटन करण्यासाठी आवश्यक घटक – नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कलचर अॅझोटो बॅक्टर – लिगनीग डिग्रेबल बॅक्टोरिया) | ६००० कि.लो | ८४ | ५०४००० |
| २२ | बॅक्ट्रो फ्रि पावडर – किटकनाशक | ४५००कि.लो | ९१ | ४१०००० |
| २३ | हॅड्रोक्लोरिक ॲसिड – शौचालय मुता–या सफाई करणेसाठी | ३००० लि. | ३० | ९०००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| २४ | बेक्टोबॅक AC – 1200 अळीनाशक | २५० लि. | १५६० | ३९०००० |
| २५ | बॅक्टोक्लीन व्हाईट क्लिनर, शौचालय सफाईसाठी | ५००० लि. | ६९ | ३४५००० |
| २६ | साईथ्रिऑन ५०% EC डासनाशक, किटकनाशक | ५०० लि. | ९१५ | ४५७५०० |

उक्त नमुद केलेली जंतूनाशके त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार खरेदीकरीता रू ६१,६४,४००/– ( रुपये एकसष्ट लाख चौसष्ट हजार चारशे मात्र ) खर्च अपेक्षित आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच एकूण मागविण्यात आलेल्या अ.क्र. १ ते २६ वर नमूद केलेल्या जंतूनाशके/रसायने औषधांसाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणा–या निविदाकार मे. डॉल्फीन सेल्स, कल्याण, मे. मित्र हर्बल प्रा. लि. कंपनी डोंबिवली, मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली व मे. रॉयल इंटरप्राईझेस, मुंबई यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता जंतुनाशक/किटकनाश औषधांचे न्युनतम दर सादर करणा–या निविदाकारांचे दर स्विकृत होऊन त्यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८ **दिनांक:– २/९/२०१३**

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती पंचशिला पवार

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत उल्लेखलेल्या उल्हासनगर शहरातील स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ जंतुनाशक/किटकनाशक औषधे पुरविणे कामी बाबनिहाय न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी जाहिर केले.

**(योगेश गोडसे)**

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.